शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयांमार्फत पुरविल्या जाणा-या शैक्षणिक सेवा आणि रुग्णसेवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी, शासनामार्फत ठोस प्रशासनिक सुधारणा संबंधित उपक्रम राबविणे व संस्थांच्या कार्यचालनाचा आढावा घेण्यासाठी विशेष कृती नियंत्रण व विश्लेषण कक्ष स्थापन करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग
शासन निर्णय क्रमांकः वैशिवि-२०२३/प्र.क्र. ८४/प्रशा-२
गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार,
गो. ते. संकुल इमारत, ९ वा मजला, मंत्रालय, मुंबई.
तारीख: १० मे २०२३

प्रस्तावना:-

महाराष्ट्र हे वैद्यकीय शिक्षण क्षेत्रात भारतातील अग्रगण्य राज्यांपैकी एक आहे. सध्य:स्थितीत राज्यात एकूण २३ शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व संलग्नित रुग्णालये कार्यान्वित आहेत. सदर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयांचे उत्कृष्टरित्या कार्यचालन होण्याकरीता, प्रत्येक संस्थेमधील ४ प्रमुख घटक जबाबदार असतात. त्यात वैद्यकीय महाविद्यालय (शैक्षणिक शाखा- अद्यावत प्रयोगशाळांसह), वैद्यकीय रुग्णालय, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांसाठी निवासी शाखा तसेच प्रशासकीय विभाग/शाखा यांचा समावेश होतो. उक्त ४ घटकांचे सुयोग्य कार्यचालन व समन्वयाची जबाबदारी संबंधीत संस्थेच्या अधिष्ठाता यांचे असते. शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालयांचे कार्यचालन, शासकीय धोरणांची अंमलबजावणी व अन्य बाबींसाठी केंद्रीकृत प्रशासनिक भाग म्हणून वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय (त्याच्या शाखांसह) कामकाज पाहते. तर वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग ही राज्यस्तरावरील निर्णय घेणारी प्रमुख संस्था म्हणून काम पाहते. जे राज्यातील सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व संलग्नित रुग्णालयांच्या कार्याचे निरीक्षण व त्यांचे पुनर्विलोकन करण्याचे कामे करते. वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय या संस्थेमार्फत सर्व संस्थांकडील माहिती गोळा करणे, सदर एकत्रित माहिती विचारात घेऊन, विभागाच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांचा प्रत्यक्ष आढावा घेऊन, संस्थांना स्थानिक स्तरावर येत असलेल्या समस्यांवर मात करण्यासाठी संबंधित संस्थांच्या अधिष्ठातांना मार्गदर्शन / मदत करण्याची कार्यवाही करण्यात येते. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयांमार्फत पुरविल्या जाणा-या शैक्षणिक सेवा आणि रुग्णसेवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी, शासनामार्फत ठोस प्रशासनिक सुधारणा संबंधित उपक्रम राबविण्याची आवश्यकता असल्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती. त्यानुसार खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे:-

शासन निर्णय :-

राज्यातील प्रत्येक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयांच्या कामगिरीचा सक्रियपणे आढावा घेण्यासाठी, “Special Performance Monitoring and Analytics Cell -PMAC” **विशेष कृती नियंत्रण व विश्लेषण कक्ष** खालील प्रमाणे स्थापन करण्यात येत आहे.

सदर कक्ष वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाच्या स्तरावर स्थापन करण्यात यावा. तसेच सदर कक्षातील इतर सदस्य, कक्षाचा संपर्क क्रमांक, ई-मेल आयडी व इतर माहिती बाबत संचालनालयाने स्वतंत्र आदेश निर्गमित करावेत.

Scanned with CamScanner

**१) सदर कक्षामार्फत राबविण्यात येणा-या प्रशासनिक सुधारणा कार्यक्रमाची प्रमुख उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत:-**

अ) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयांच्या दैनंदिन कामकाजाबाबत निश्चित करण्यात आलेल्या मानकांच्या (Data Points) आधारे संस्थाच्या मासिक कामगिरीचे पुनर्विलोकन करणे. (उदा. PMJAY महसूल संकलन व इतर)

आ) संस्थांच्या दैनंदिन कामकाजातील अडथळ्यांचा शोध घेणे (उदा. कर्मचारी उपस्थिती, परिचालन व व्यवस्थापन, विक्रेता व्यवस्थापन इ.)

इ) संस्थांमधील प्रशासनिक व दैनंदिन कामकाज सुधारण्यासाठी तयार करण्यात आलेल्या कृती आराखड्याच्या अंमलबजावणीचा आढावा घेणे. उदा. नवीन परिचालन व व्यवस्थापन करार, कंत्राटी कर्मचारी नियुक्ती इ.)

**२) पुनर्विलोकन प्रक्रिया:-**

कार्यक्रमाचा एक भाग म्हणून, प्रत्येक शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांच्या कार्यक्षमतेचे मूल्यांकन करण्यासाठी मेट्रिक आधारित पुनर्विलोकन कार्यपद्धती तयार करण्यात येईल. सदर कार्यपद्धती खालीलप्रमाणे:-

अ) माहिती संकलन आणि विश्लेषण:-

संस्थांच्या कार्यक्षमतेचे योग्यरित्या पुनर्विलोकन करण्यासाठी, सर्व संस्थांच्या अधिष्ठाता यांनी प्रत्येक महिन्यासाठी खालील तक्त्यात नमुद माहिती एकत्रित करण्याची कार्यवाही करावी. तसेच अधिष्ठाता यांनी संस्थास्तरावर संकलित केलेली माहिती, विशेष कृती नियंत्रण व विश्लेषण कक्षास दर महिन्याच्या दुसऱ्या बुधवारी ई-मेलद्वारे सादर करावी.

| Sr No. | Data required | Data source |
|---|---|---|
| १ | No. of Surgeries conducted in Month | OT register |
| २ | No. of surgeons available | OT register |
| ३ | Amount of PMJAY collections | PMJAY claim data |
| ४ | No. of Clinical faculty available | HR database aim form / payments |
| ५ | % Drug procurement logged on E-Aushadhi | e-Aushadhi portal |
| ६ | Total drug procurement | Budgetary spend |
| ७ | Last quarter spend | Account records |
| ८ | Annual funds | Account records |
| ९ | Total absent days | Biometric data |
| १० | Total working days | Biometric data |



Scanned with CamScanner

सदर संकलित माहिती प्राप्त झाल्यावर, विशेष कृती नियंत्रण व विश्लेषण कक्ष सदर माहितीचे विश्लेषण करेल. त्यानुसार प्रत्येक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयास श्रेणी (Grading) प्रदान करेल. तसेच प्रत्येक श्रेणीनिहाय आढावा घेण्यासाठी एक नोडल अधिकारी नियुक्त केला जाईल.

व) आढावा बैठक

प्रत्येक महिन्याच्या तिस-या बुधवारी वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयामध्ये सचिव (वै. शि.) यांच्या अध्यक्षतेखाली मासिक आढावा बैठक आयोजित केली जाईल. सदर बैठकीस विशेष कृती नियंत्रण व विश्लेषण कक्षाचे सदस्य आणि शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयांमधील संबंधित अधिकारी यांची उपस्थिती अनिवार्य असेल. या आढावा बैठकीमध्ये खालील मुद्द्यांवर चर्चा करण्यात येईल:-

१. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांच्या एकूण श्रेणींची वर्गवार चर्चा.

२. प्रमुख समस्यांची मूळ कारणे आणि संभाव्य निराकरणे याबाबत प्रत्येक श्रेणीतील निम्न श्रेणी प्राप्त करणा-या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या अधिष्ठाता व नोडल अधिकाऱ्यांशी चर्चा करुन, याबाबत करावयाच्या संभाव्य उपाययोजनांची व्यवहार्यता आणि अंमलबजावणी याबाबत निश्चिती.

३. मागील बैठकीत चर्चा केलेल्या बाबींची सध्य:स्थिती आणि प्रलंबित बाबींच्या पुढील कार्यवाहीबाबत चर्चा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(म.गि.जोगदंड)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मंत्री (वै. शि.) यांचे खाजगी सचिव, वैद्यकीय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन तसेच आयुष संचालनालय , मुंबई.
४. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.
५. सर्व अधिष्ठाता / अधीक्षक, शासकीय वैद्यकीय / दंत महाविद्यालये व रुग्णालये.
५. निवडनस्ती (प्रशा-२),



Scanned with CamScanner